वाचले :
१. यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय यांचेकडील पत्र क्र. वाय.सी. एम. एच. १/ कावि/२४३९/२०२३, दि.२८/१२/२०२३
२. पदव्युत्तर संस्था य. च. स्मृती रूग्णालय यांचेकडील पत्र क्र. वाय.सी. एम. एच. १/ कावि/१२५८/२०२४, दि.१०/०७/२०२४
३. मा. आयुक्त सो. यांचे आदेश क्र. सा.प्र.वि./२/कावि/२३६/२०२४, दि. ०३/०४/२०२४
३. मा. आयुक्त सो. यांचा दि. १० / १२ /२०२४ चा मान्य प्रस्ताव

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सामान्य प्रशासन विभाग**
क्र.साप्रवि/२२/कावि/४८३/२०२४
दिनांक - १२ / १२ /२०२४

**विषय — कार्यमुल्यमापन अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन करून देण्याच्या कार्यपद्धतीबाबत**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे व्यवस्थापनावरील गट "ब" ते गट "ड" संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी तसेच यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय व पदव्युत्तर पदवी संस्थेशी संबंधीत शैक्षणिक व्यवस्थापनावरील सर्व गट "अ" संवर्गातील वैद्यकिय सेवेशी संबंधित अधिकारी, अधिष्ठाता यांचेवर दिनांक ०३/०४/२०२४ रोजीचे आदेशान्वये सनियंत्रण सोपविण्यात आलेले आहे.

अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी व अधिष्ठाता यांना विभागप्रमुखांचे अधिकार सोपविण्यात आलेले आहेत. यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय, पदव्युत्तर पदवी संस्थेच्या व्यवस्थापनावर कार्यरत गट "अ" ते गट "क" संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांनी आपला स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल विहित वेळेत सादर केल्यानंतर अशा स्वयंमुल्यनिर्धारण अथवा मुल्यमापन अहवालांवर प्रतिवेदन व पुनर्विलोकन करण्यासाठी खालीलप्रमाणे प्राधिकारी सुनिश्चित करणेत येत आहे.

| अ.क्र | पदाचा तपशिल | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | अधिष्ठाता | अतिरिक्त आयुक्त | आयुक्त |
| २. | यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय पदव्युत्तर पदवी संस्थेच्या व्यवस्थापनावरील वैद्यकिय विद्याशाखेशी संबंधित सर्व गट "अ" संवर्गातील अधिकारी / प्राध्यापक | अधिष्ठाता यांनी घोषित केलेले संबंधित वैद्यकिय विद्याशाखेचे विभागप्रमुख | अधिष्ठाता |
| ३. | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता | अतिरिक्त आयुक्त |
| ४. | वैद्यकीय उप अधिक्षक | अधिष्ठाता | अतिरिक्त आयुक्त |
| ५. | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी | अतिरिक्त आयुक्त |
| ६. | यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे आस्थापनेवरील सर्व गट "ब" ते "क" संवर्गातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी | वैद्यकिय अधिक्षक | अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी |
| ७. | अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय यांना दि. ०३/०४/२०२४ रोजीच्या आदेशान्वये सोपविण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाअंतर्गत विभागामधील कार्यरत असलेले गट "ब"ते"क" संवर्गातील अधिकारी व कर्मचारी | वैद्यकिय अधिक्षक | अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी |
| ८. | यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे आस्थापनेवर कार्यरत असलेले विशेष तज्ञ मात्र इतर महापालिका रूग्णालयामध्ये कार्यरत असणारे "अ" व "ब" संवर्गातील अधिकारी | संबंधित रूग्णालय प्रमुख | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी |

सदर अधिसूचित करण्यात आलेल्या प्रतिवेदन अधिका-याकडे आपला स्वयंमूल्यनिर्धारण अहवाल विहित वेळेत सादर करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील.

अशाप्रकारे आपला स्वयंमूल्यनिर्धारण अहवाल संबंधित प्रतिवेदन अधिका-याकडे सादर केल्याचे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना विनाविलंब संबंधित प्रतिवेदन अधिकारी, पुनर्विलोकन अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त निर्देशानुसार प्रतिवेदित व पुनर्विलोकित करण्यास न आलेले कार्यमुल्यमापन अहवाल असल्यास त्या वर्षाचा / कालावधीचा कार्यमुल्यमापन अहवाल विचारात घेतला जाणार नाहीत.

पुनर्विलोकन अधिका-यांच्या संदर्भात जेथे शंका असेल अशा प्रकरणी संबंधित प्रतिवेदन अधिका-यांच्या कार्यमुल्यमापन अहवालाचे प्रतिवेदन जो वरिष्ठ अधिकारी करतो, तो अधिकारी पुनर्विलोकन अधिकारी म्हणून समजण्यात यावा.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक ०१/११/२०११ अन्वये विहित करण्यात आलेल्या इतर मार्गदर्शक सूचना व दिशानिर्देशक आणि कार्यपद्धतीचे अनुपालन करण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

**(शेखर सिंह)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

**प्रति,**

१) **अधिष्ठाता**
२) **अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी**
**यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.